# University of Mumbai

परीक्षा विभाग/ निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/निकाल/759/२०१५

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, परीक्षांचे अर्ज स्विकारण्यासंदर्भातील विद्यापीठ परिपत्रक क्रमांक Exam./Results/491 of 2007 date 8th June 2007 मध्ये नमुद असलेल्या प्रथम सत्र परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्यासाठी निश्चित केलेल्या तारखांमध्ये प्रथम सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी तात्पुरता बदल केला असून नवीन सुधारीत तारखांचा तपशील खालील प्रमाणे असून यानुसार परीक्षा अर्ज स्विकारण्यात येणार आहेत.

| Examination of All Courses (Only for Offline Forms) | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | परीक्षा शुल्क | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | परीक्षा अर्ज व विहित फी विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
| १. | नियमित फी | २८/१२/२०१५ पर्यंत | ३१/१२/२०१५ |
| २. | विलंब शुल्क रू. १००/— | २९/१२/२०१५ ते ०४/०१/२०१६ | ०६/०१/२०१६ |
| ३. | विलंब शुल्क रू. ५००/— | ०५/०१/२०१६ ते ११/०१/२०१६ | १३/०१/२०१६ |

**(वरील तारखांचा तपशिल फक्त ज्या शिक्षणक्रमाच्या परीक्षांचे परीक्षा प्रवेश अर्ज पारंपारिक पद्धतीने (Hard Copy ) स्विकारण्यात येत आहेत त्यांच्यासाठी लागू आहे. (Online घेण्यात येणारे परीक्षा अर्ज सोडून)**

पुढे आपल्या माहितीस्तव पुन्हा असेही सुचित करण्यात येते की, जे विद्यार्थी द्वितीय सत्र २०१५ मध्ये घेतलेल्या पदवी शिक्षणक्रमाच्या सत्र ५ च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या सत्र ६ या परीक्षेचे प्रवेश अर्ज त्यांनी ऑक्टोबर, २०१५ मध्ये दिलेल्या सत्र ५ च्या परीक्षेच्या निकालाची प्रतिक्षा न करता वरील तारखांचा तपशीलाप्रमाणे सादर करावेत व जे विद्यार्थी एम.ए./एम.कॉम/एम.एस्सी. या पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या सत्र १ व ३ च्या परीक्षांसाठी ऑक्टोबर, २०१५ मध्ये प्रविष्ठ झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या सत्र २ व सत्र ४ परीक्षासाठीचे परीक्षेचे प्रवेश अर्ज त्यांनी ऑक्टोबर, २०१५ मध्ये दिलेल्या सत्र १ व सत्र ३ च्या परीक्षांच्या निकालांची प्रतिक्षा न करता वरील तारखांप्रमाणे सादर करावेत.

तसेच द्वितीय सत्र २०१५ च्या परीक्षांमध्ये प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१६ साठीचे परीक्षा प्रवेश अर्ज संबंधीत परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विहित शुल्कासहीत सादर करावेत.

जे विद्यार्थी द्वितीय सत्र २०१५ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण होतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज ( Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच संबंधीत परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विहीत शुल्कासहीत सादर करावेत.

तरी सदर परिपत्रकाचे तंतोतंत पालन करावे.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. २७ नोव्हेंबर, २०१५.

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव

प्रत माहितीस्तव :—

१. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा भवन
२. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग
३. स्वीय सहायक, कुलसचिव, संचालक बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक व वित्त व लेखा अधिकारी